# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, कृषि नगर, अकोला
## कृषि नगर, अकोला - ४४४ १०४

**संदर्भ - विद्यापीठ जाहिरात क्र. कृविके/जाहिरात/२०१५, दि. २४ जुलै २०१५**

## सु च ना

**क्र. कृविके/जाहिरात/२०१६** **दिनांक : २३ सप्टेंबर, २०१६**

डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठांतर्गत असलेल्या कृषि विज्ञान केंद्रातील वाहन चालक-नि-यांत्रिक या संवर्गाची पदे भरण्यासाठी घेण्यात आलेल्या लेखी परिक्षा व व्यावसायीक चाचणीत प्राप्त गुणांची यादी विद्यापीठाचे संकेतस्थळावर यापुर्वीच प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार प्राप्त गुणांच्या आधारे, जाहीरातीमधील पदसंख्येच्या अनुषंगाने प्रवर्गनिहाय बोलाविण्यात येणा-या उमेदवारांचे नांवाची यादी संकेतस्थळ www.pdkv.ac.in वर प्रसिध्द करण्यात येत असून सदर उमेदवारांनी त्यांचे कागदपत्रांचे पडताळणीसाठी खालील नमुद प्रमाणे हजर होणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | पदाचे नांव | दिनांक | वेळ | स्थळ |
|---|---|---|---|---|
| १) | वाहन चालक नि यांत्रिक | दि. २८/०९/१६ | सकाळी ०९.०० वाजता | विद्यापीठ अतिथीगृह, कृषि महाविद्यालयाचे मागे, कृषिनगर अकोला |

उपरोक्त नुसार संबंधीत उमेदवारांनी लेखी परिक्षचे प्रवेशपत्र व ओळखपत्र तसेच अर्जामध्ये नमुद केलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या मुळ प्रती व छायांकीत प्रतींचा एक संच सोबत आणावा. (नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र आवश्यक असणा-या उमेदवारांबाबत दि. २५.०८.२०१५ रोजी वैध व उपलब्ध असलेले प्रमाणपत्र आवश्यक) कागदपत्रांच्या छाननीसाठी बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी नियोजीत दिवशी वेळेवर उपस्थित रहावे. जे उमेदवार नियोजीत वेळ व दिनांकास उपस्थित होणार नाही अथवा जे उमेदवार नमुद केलेली कागदपत्रे पुरविण्यास असमर्थ ठरतील अशा उमेदवारांना अधिक गुण प्राप्त असले तरी त्यांची उमेदवारी ग्राहय धरण्यात येणार नाही तसेच नंतर त्याविषयी कुठल्याही प्रकारची तक्रार/विनंती मान्य करण्यात येणार नाही याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

केवळ कागदपत्र छाननीसाठी बोलाविण्यात आले म्हणून उमेदवारांनी निवड झाली असे समजण्यात येवू नये. छाननी नंतर जाहिरात केलेल्या प्रवर्गानूसार पात्र ठरलेल्या गुणवत्ताधारक उमेदवारांची निवड मुलाखती शिवाय करण्यात येणार आहे.

**स्वाक्षरीत/-**
कुलसचिव,
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

Mcert